प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख) महाराष्ट्र राज्य नागपूर यांचे कार्यालय
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य नागपूर
पहिला माळा, बी विंग, वनभवन, सिव्हील लाईन्स, नागपूर – ४४० ००१
दुरध्वनी क्र. ०७१२-२५५६९१६ इ-मेल- apccfnodal@mahaforest.gov.in

क्रमांक कक्ष – १७/ नोडल/नागपूर/आयडी १२७७८/२५८२ /२०२१-२२
नागपूर – ४४० ००१, दिनांक २/०३/२०२२

विषय – Forest land – Nagpur
Diversion of 3.064 ha. forest land for construction of 220 KV D/C Transmission Line from Umred to Nagbhid under Forest Conservation Act, 1980 (Bramhapuri-2.998 ha. & Nagpur-0.066 ha.)
(FP/MH/TRANS/44469/2020)

संदर्भ – १) मुख्य वनसंरक्षक (प्रा) नागपूर यांचेकडील पत्र क्र. ७४५, दि. १०/११/२०२१, क्र. १०३०, दि. ३०/१२/२०२१ व क्र. १२०३, दि. ४/२/२०२२
२) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) म.रा. नागपूर यांचेकडील कार्यालयीन टिपणी क्र. कक्ष-२३(२)वजी/सर्व्हे/प्र.क्र.१८८ (नोडल)/३०६६, दि. २८/२/२०२२

संदर्भिय पत्रान्वये वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गत २२० के.व्ही.डी.सी.उमरेड ते नागभिड ट्रान्समिशन लाईनकरीता ३.०६४ हे. वनजमिन वळतीकरणाचा प्रस्ताव सादर केला आहे. सदर प्रस्तावातील प्रस्तावित क्षेत्र संरक्षित क्षेत्र /अभयारण्य इ. पासून १० कि. मी. अंतराच्या आत येत आहे. त्यामुळे सदर प्रस्तावास राज्य वन्यजीव मंडळ/राष्ट्रीय वन्यजीव मंडळाच्या मान्यतेसाठी वन्यजीव मंजूरीचा प्रस्ताव पाठविण्याची आवश्यकता आहे किंवा कसे याबाबत मा. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) म.रा. नागपूर यांचे अभिप्राय घेण्यांत आले.

२.०० प्रस्तुत प्रकरणी मा.प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) म.रा. नागपूर यांनी संदर्भिय कार्यालयीन टिपणी क्र. २ अन्वये प्रस्तुत प्रकल्पासाठी वन्यजीव व्यवस्थापनाच्या दृष्टीकोनातुन ज्या उपशमन-उपाययोजना सूचविण्यात येतील, त्या सर्व उपशमन-उपाययोजना प्रकल्प यंत्रणेस बंधनकारक राहतील. "सूचविण्यात येणा-या उपशमन-उपाययोजना प्रत्यक्ष कार्यान्वित करुन त्या प्रकल्प यंत्रणेला उभारणी करणे आवश्यक राहील व त्यासाठी प्रकल्प यंत्रणा बांधील आहे" अशा आशयाचे बंधपत्र प्रकल्प यंत्रणेकडून घेण्यात यावे. तसेच प्रस्तावित प्रकल्पाचे क्षेत्र हे व्याघ्र भ्रमण मार्गात येत असल्यामुळे, वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ चे कलम ३८ O 1 (g) नुसार त्यांस वन्यजीव मान्यता घेणे आवश्यक आहे. तरी प्रकल्प यंत्रणेस वन्यजीव मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यांस कळविण्यांत यावे, असे कळविले आहे. सुलभ संदर्भाकरीता सदर कार्यालयीन टिपणीची प्रत सोबत जोडली आहे.

३.०० आपणास कळविण्यांत येते की, मा.प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) म.रा. नागपूर यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही करुन अहवाल या कार्यालयास सादर करावा. तसेच सदर प्रकरणी केंद्र शासन पत्र दि. ६/१/२०२२ व दि.१९/१/२०२२ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार Net Present Value आकारुन सुधारीत प्रमाणपत्र सादर करावे.

**सहपत्र – वरीलप्रमाणे**

2/3/22

(नरेश झुरमुरे)
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी,
म.रा. नागपूर

प्रति,
मुख्य वनसंरक्षक (प्रा.) नागपूर
प्रतिलिपी – प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) म.रा. नागपूर यांना माहितीकरीता सादर.
प्रतिलिपी – उपवनसंरक्षक, नागपूर वनविभाग, नागपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित.
प्रतिलिपी – कार्यकारी अभियंता, एचव्ही प्राजेक्ट डिवीजन-१, २ रा माळा, विद्युत भवन, काटोल रोड, नागपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित.

(34)

वन विभाग

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, यांचे कार्यालय

**O/o Principal Chief Conservator of Forests (HoFF), Maharashtra State**

Phone No.- 0712-2560953
E-mail - pccfwlngp@mahaforest.gov.in
Website – www.mahaforest.gov.in

**प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य,**
Principal Chief Conservator of Forest (Wildlife) Maharashtra State
"Van Bhavan", 3rd Floor, Ramgiri Road, Civil Lines, Nagpur – 440 001.

क्रमांक :- कक्ष-२३(२)/वजी/सर्व्हे/प्र.क्र. १८८(नोडल)/३०६६ /२०२१-२२, दिनांक२८/०२/२०२२

## कार्यालयीन टिप्पणी

विषयः- Forest land - Nagpur
Diversion of 3.064 ha. forest land for construction of 220 KV D/C Transmission Line from Umred to Nagbhid Under Forest Conservation Act, 1980 (Bramhapuri-2.998 ha. & Nagpur – 0.066 ha.)

संदर्भ:- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी म.रा.नागपूर यानी विषयांकीत प्रकरणी त्यांचेकडील पत्र क्र. कक्ष-१७/नोडल/नागपूर/आयडी-१२७७८/२४१९, दिनांक १५/०२/२०२२ अन्वये मुख्य वन्यजीव रक्षक, म.रा. यांचे अभिप्रायासाठी सादर केलेली नस्ती क्रमांक FP/MH/TRANS/44469/2020.

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचेकडून विषयांकित प्रकरणी ३.०६४ हे. वनजमिन वळतीकरणाच्या प्रस्तावाचे अनुषंगाने, मुख्य वन्यजीव रक्षक, म.रा. यांचे अभिप्रायासाठी या कार्यालयास दिनांक १६/०२/२०२२ रोजी प्राप्त झालेली आहे.

प्रस्तुत प्रस्तावामध्ये सहपत्रीत असलेल्या अभिलेखानुसार, वळतीकरणासाठी प्रस्तावित असलेल्या वनक्षेत्राची खात्री केली असता, खालील बाबीं निदर्शनास येत आहेत.

- प्रस्तुत वीज वाहीणीसाठी ब्रम्हपूरी वनविभागा अंतर्गत २.९९८ हे. आणि नागपूर वनविभागा अंतर्गत ०.०६६ हे. असे ऐकूण ३.०६४ हे. वनजमीन प्रस्तावित आहे. सदर वनक्षेत्र व्याघ्र भ्रमणमार्गात/ पर्यावरण संवेदनशील क्षेत्रात येत आहे किंवा कसे याबाबत तपासणी केली असता, वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे.

Nagpur
Chandrapur
28/2

3836
28/2/022

28/2
updated

| अ.क्र. | वनविभाग | गाव | सर्व्हे क्र. | वनखंड क्र. | वनक्षेत्र (हे.) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Bhrampuri | Sathgaon Tah.Chimur | 384 | - | 0.025 | Not in EVL |
| 2. | | Kanpa Tah. Nagbhid | 241 | - | 0.079 | EVL P.No. 266 ID-02 |
| | | Kanpa Tah. Nagbhid | 242 | - | 0.085 | |
| | | Kanpa Tah. Nagbhid | 262 | 498 | 1.465 | TATR-TCP-P.No. 51 Sr. No. 1655 & EVL P. No. 266 ID-02 |
| 3. | | Bikli Tah. Nagbhid | 278 | 498 | 0.760 | TATR-TCP-P.No. 51 Sr. No. 1655 & EVL P. No. 265 ID-16 |
| | | Bikli Tah. Nagbhid | 35 | 498 | 0.532 | |
| | | Bikli Tah. Nagbhid | 296 | - | 0.024 | EVL P. No. 265 ID-16 |
| 4. | | Mohali Makasa Tah. Nagbhid | 21 | - | 0.027 | EVL P.No. 265 ID-45 |
| 5. | Nagpur | Kalandri | 70 | - | 0.21 | EVL P.No. 195 ID-1093 |
| 6. | | Sonegaon | 45 | - | 0.045 | Not in EVL |

- वरील तपशिलानुसार प्रस्तुत प्रस्तावातील वनक्षेत्र व्याघ्र भ्रमण मार्गात येत असल्याचे दिसून येते.
- प्रस्तुत प्रस्तावातील क्षेत्र घोडाझरी अभयारण्य सीमेपासून २ कि.मी. अंतरावर असल्याचे उपवनसंरक्षक, ब्रम्हपूरी यांनी दिनांक ११/०२/२०२१ रोजीचे प्रमाणपत्रा द्वारे प्रमाणीत केले आहे.
- घोडाझरी वन्यजीव अभयारण्यासाठी पर्यावरण संवेदनशील क्षेत्राची अंतिम अधिसुचना निर्गमित न झाल्यामुळे प्रस्तावातील क्षेत्र मानीव पर्यावरण संवेदनशील क्षेत्रात येत आहे.
- प्रस्तुत प्रस्तावास पर्यावरण मान्यतेची (EC) गरज नसल्यामुळे पर्यावरण संवेदनशील क्षेत्रातील कामासाठी वन्यजीव मान्यतेची गरज नसली तरी, प्रस्तावित वनक्षेत्र व्याघ्र भ्रमणमार्गातून

असल्यामुळे प्रकल्प यंत्रणेस राज्य आणि राष्ट्रीय वन्यजीव मंडळाचे मान्यतेसाठी रितसर प्रस्ताव विहित मार्गाने सादर करणे बंधनकारक आहे.

- प्रस्तुत प्रकल्पासाठी वन्यजीव व्यवस्थापनाच्या दृष्टिकोनातून ज्या उपशमन-उपाययोजना सूचविण्यात येतील, त्या सर्व उपशमन-उपाययोजना प्रकल्प यंत्रणेस बंधनकारक राहतील. तसेच सूचविण्यात येणा-या उपशमन-उपाययोजना प्रत्यक्ष कार्यान्वित करुन व त्या प्रकल्प यंत्रणेला उभारणी करणे आवश्यकच राहील, व त्यासाठी प्रकल्प यंत्रणा बांधील आहे. अश्या आशयाचे बंधपत्र प्रकल्प यंत्रणेकडून घेण्यात यावे व ते बंधनकारक राहील.
- वरील तपशीलानुसार, प्रस्तावित प्रकल्पाचे क्षेत्र हे व्याघ्र भ्रमणमार्गात येत असल्यामूळे, वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ चे कलम ३८ (o) 1 (g) नुसार त्यांस वन्यजीव मान्यता देणे आवश्यक आहे. तरी प्रकल्प यंत्रणेस वन्यजीव मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेबाबत आपले स्तरावरून कळविण्यात यावे.

**यासोबत आपणाकडून संदर्भिय पत्रान्वये प्राप्त झालेली मूळ नस्ती परत पाठविण्यात येत आहे.**

**सहपत्र- वरील प्रमाणे**

**(सुनील लिमये)**
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव)
महाराष्ट्र राज्य

प्रति,
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी,
महाराष्ट्र राज्य, नागपूर